# प्रेसनोट तारीख १३/०१/२०२३

## शिरगाव परंदवडी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

### मौजे चांदखेड ता. मावळ, जि. पुणे, येथे गावचे यात्रे दरम्यान दहशत पसरवण्याचे उद्देशाने गोळी बार करणारे आरोपीना ०४ तासात अटक

## शिरगाव परंदवडी पोलीस स्टेशन पथकाची कामगिरी

-------------------oo------------------

**शिरगाव परंदवडी पोलीस स्टेशन हद्दीमधील मौजे चांदखेड, ता. मावळ, जि. पुणे येथे गावचे यात्रे दरम्यान गावातील काही तरुणानी गावामध्ये दहशत पसरवण्याचे उद्देशाने चांदखेड गावामध्ये जिल्हा परिषद शाळे समोरील रस्त्यावर हातात पिस्टल व कोयते घेवुन मोठ मोठयाने आरडा ओरडा करत यात्रेमध्ये गर्दीचे ठिकाणी देशी बनावटी पिस्टल मधुन लोकांच्या दिशेने जिवे मारण्याचे उद्देशाने गोळीबार करुन हातामध्ये लोखंडी कोयते घेवुन गाडयाच्या काचा फोडुन यात्रेमध्ये खेळणी विक्री करणारे तंबु कोयत्याने फाडुन, लोखंडी पेटयावर कोयते मारुन त्यांचे मोठया प्रमाणात नुकसान करुन गावातील लोकांनी यात्रे निमित्त लावलेले फ्लेक्स फाडुन, त्यांनी चांदखेड गावामध्ये देशी बनावटीचे पिस्टल व्दारे केलेला गोळीबार यांचा व्हिडीओ मध्ये "ए जी कंपनी व किंग ऑफ चांदखेड" असे प्रकारचे वाक्य टाकुन तो व्हिडीओ सोशल मिडीया वरती व्हायरल करुन गावामध्ये तसेच पिंपरी चिंचवड परीसरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. गावामध्ये दहशत पसरवुन गर्दीचा फायदा घेवुन ते सर्व पळुन गेल्याने शिरगाव परंदवडी पोलीस स्टेशन गु. रं.नं. ०८/२०२२ भादवी ३०७, ४२७, आर्म ॲक्ट कलम ३/२५, ४/२५, क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ प्रमाणे दिनांक ११/०७/२०२३ रोजी सदर इसमा विरुध्द गुन्हा दाखल आहे.**

सदर गुन्हयाचा अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक वनिता धुमाळ यांचे मागदर्शानाखाली शिरगाव परंदवडी पोलीस स्टेशन येथे नेमणुकीस असलेले पोना/१२३१ एस.बी.घाडगे व पोअंम/२२४१ एस.एल.फडतरे यांनी सुरु केला असता सदर अंमलदार यांना त्यांचे खबऱ्या मार्फत माहिती मिळाली कि, सदर गुन्हयातील आरोपी हे चांदखेड कासारसाई रोड ने हिंजवडी बाजुकडे हातामध्ये कोयते व देशी बनावटीचे पिस्टल घेवुन पळुन जात असल्याची माहिती मिळाल्याने त्यांचा पाठलाग केला असता त्यांनी थेरगाव येथिल त्यांचा एक मित्र सोबत घेवुन पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे हद्दीमध्ये कोयता दाखवुन सदर ठिकाणी ही दहशत निर्माण करुन सदर गुन्हयातील आरोपी औंध गावठाण पुणे शहर येथे लपुन बसल्याची माहिती गुप्त बातमी दारा व्दारे मिळाली. औंध गावठाण पुणे शहर या ठिकाणी पोना/१२३१ एस बी घाडगे व पोअंम/२२४१ एस एल फडतरे यांनी सदर ठिकाणी जावुन सापळा रचुन अतिशय शिताफिने यातील आरोपीना औंध गावठाण पुणे शहर येथे लपुन बसलेल्या ठिकाणावरुण एकुण ०६ जनांना ताब्यात घेतले. त्यांचेकडे चौकशी करुन अवघ्या ०४ तासात गुन्हा उघडकीस आणला व त्यांना गुन्हयामध्ये अटक केली आहे. अटक केलेले आरोपी नामे **१) अविनाश बाळासाहेब गोठे वय २२ वर्षे, रा. चांदखेड, ता.मावळ, जि.पुणे २) विजय अशोक खंडागळे वय १९ वर्षे, रा चांदखेड, ता मावळ, जि पुणे ३) अमर उत्तम शिंदे वय २२ वर्षे, रा परंदवडी, ता मावळ, जि पुणे ४)मनिष शिवचरण यादव वय २० वर्षे, रा चांदखेड, ता मावळ जि पुणे ५)अनिकेत अनिल पवार वय २६ वर्षे, रा पवार नगर लेन नंबर ०२, बारने कॉर्नर, थेरगाव पुणे ६)प्रेम सुरेश पाथरकर वय १७ वर्षे रा बेबडओहोळ, ता. मावळ, जि. पुणे (विधी संघर्षित बालक) यांना अटक करण्यात आलेले असुन** सदर आरोपीकडुन **देशी बनावटीचे ०२ पिस्टल व ०२ कोयते जप्त करण्यात आलेले आहे**.

सदर गुन्हयाचा अधिक तपास पोउपनि बी.सी.गावीत हे करत असुन सध्या आरोपी पोलीस कस्टडी मध्ये आहेत.

**सदरची कारवाई पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे सो।, सह. पोलीस आयुक्त श्री मनोजकुमार लोहिया सो।, अपर पोलीस आयुक्त श्री डॉ संजय शिंदे सो।, पोलीस उप आयुक्त श्री डॉ. काकासाहेब डोळे सो, सहा. पोलीस आयुक्त, देहुरोड विभाग, श्री पद्माकर घनवट सो।, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिरगाव परंदवडी पो.स्टे. वनिता एस धुमाळ, पोना/१२३१ समिर बी घाडगे, पोअंम/२२४१ समाधान एल फडतरे यांनी केलेली आहे.**

(डॉ.काकासाहेब डोळे)
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ-०२, पिंपरी चिंचवड शहर